। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूजचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

ता. खटाव जि.सातारा



## पर्यावरण अभ्यास

# पर्यावरण व जनजागृती

बी. ए. भाग -२

१) कु. कारंडे प्राजक्ता सहदेव 138359 ३६७
२) कु. जाधव नयना हणमंत 138356 ३६१
३) कु. जाधव स्नेहल आनंदराव 138292 ३३४
४) कु. जाधव प्रियांका राजाराम 138291 ३३२

पर्यवेक्षक
प्रा. गोडसे डी.आर.
सहा. प्राध्यापक
कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

सन २०१५-१६

Scanned with CamScanner

। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूजचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

ता. खटाव जि.सातारा



पर्यावरण अभ्यास

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, कु. कारंडे प्राजक्ता सहदेव हिने पर्यावरण व जनजागृती हा प्रकल्प शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या अभ्यासक्रमानुसार बी. ए. भाग - २ पर्यावरण अभ्यास या विषयांच्या परीक्षेसाठी केला आहे. हा क्षेत्रीय प्रकल्प माझ्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आला.

Exam

27/30

पर्यवेक्षक

प्राचार्य

कला व वाणिज्य महाविद्यालय
वडूज ता. खटाव जि. सातारा

Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र

आम्ही /मी खाली सही करणार असे प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, सदर क्षेत्रीय प्रकल्प आम्ही / मी स्वत: केलेला आहे.

स्थळ :

दि.

| विद्यार्थ्यांचे नाव : | सही |
|---|---|
| १) कु. कारंडे प्राजक्ता सहदेव | PKarande |
| २) कु. जाधव नयना हणमंत | N.H.Jadhav. |
| ३) कु. जाधव स्नेहल आनंदराव | S.A.Jadhav. |
| ४) कु. जाधव प्रियांका राजाराम | PRJadhav |

Scanned with CamScanner

## आभार

२०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयातील बी.ए. भाग -२ या वर्षासाठी पर्यावरण अभ्यास या विषयांतर्गत क्षेत्रीय प्रकल्प करण्याची संधी शिवाजी विदयापीठ,कोल्हापूर यांनी उपलब्द करून दिली. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा मी ऋणी आहे.

क्षेत्रीय प्रकल्प करीत असताना विषय निवडीचे स्वातंत्र, प्रत्येक प्रश्नासाठी योग्य मार्गदर्शन व सातत्याने प्रोत्साहन दिल्याबद्दल माननीय प्राचार्य श्री.जाधव एल.जी. यांचे मी आभारी आहे.

या क्षेत्रीय प्रकल्पादरम्यान योग्य मार्गदर्शन करणारे आणि पुरक माहिती देणारे क्षेत्रीय प्रकल्पाचे प्रा. गोडसे डी. आर. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक ते माहिती देणारे क्षेत्रीय क्षेत्रातील सहकारी यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्रशासकीय वर्ग यांच्या सहकार्याबद्दल व सार्थ कॉम्प्यूटर वडूज यांनी प्रकल्पाच्या दर्जेदार छपाईकामी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

दिनांक :

| विद्यार्थ्यांचे नाव | रोल क्र. |
|---|---|
| १) कु. कारंडे प्राजक्ता सहदेव | ३६७ |
| २) कु. जाधव नयना हणमंत | ३६१ |
| ३) कु. जाधव स्नेहल आनंदराव | ३३४ |
| ४) कु. जाधव प्रियांका राजाराम | ३३२ |

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १<br>१<br>१<br>१<br>१ | ओळख व कार्यपध्दती<br>प्रस्तावना<br>गृहीतके<br>उद्दिष्टये<br>कार्यपध्दती | |
| | प्रस्तावना | |
| | अभ्यास पध्दती | |
| | पर्यावरण व्यवस्थापनाचे शिक्षण | |
| | सकाळ वृत्तपत्र आणि पर्यावरण | |
| | सकाळ वृत्तपत्रातून वृत्तांचे विश्लेषण | |
| | पर्यावरण व्यवस्थापन | |
| | पर्यावरण व्यवस्थापन अभ्यासक्रम उद्देश | |
| | शेती विषयक | |
| | पाणी | |
| | आरोग्य | |
| | निष्कर्ष | |
| | चर्चा | |


Scanned with CamScanner

पर्यावरण प्रकल्प

## प्रस्तावना

आजकाल पर्यावरण हा शब्द सर्वांच्या ओठावर आलेला आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही आजची गरज सर्वांनाच वाटत आहे. सध्या हा चिंतेचाच विषय आहे. म्हणून पर्यावरण म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे.

पर्यावरण आणि मानव यांचा जवळचा संबंध आहे. पर्यावरणाचा संरक्षणासाठी मानवाने समाजात जनजागृती करणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने यात भाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आज शाळा व कॉलेज यातून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपन जागृती होते. हे उपक्रम राबविल्यामुळे पर्यावरण जन जागृती होते. म्हणूनच आज संपूर्ण जगात ५ जून हा दिवस विश्व पर्यावरण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

आपले कर्तव्य हे आहे की, सध्याच्या स्थितीत पर्यावरण हा अतिशय चिंतेचा विषय बनला आहे. तरीपण संरक्षणासाठी आपण काय केले पाहिजे व आपले कर्तव्य काय आहेत याची माहिती होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाचा सहभाग हा महत्वाचा असतो. दुसरी गोष्ट म्हणजे भूमीचे खरे अनुकुल उपयोग व्हायला हवेत रसायणे आणि किटकनाशकांचे उपयोग कमी प्रमाणात व्हायला पाहिजेत. परिस्थितीमधील संकुलन कायम ठेवण्यासाठी खनन क्षेत्रात विशेष लक्ष द्यायला हवेत वनीकरणासाठी वनक्षेत्रीय भूमी आहे आणि तेल विस्तार करणे गरजेचे आहे. कोळसा आणि तेल यासारख्या परंपरागत ऊर्जेच्या प्रदुषणकारी समाधान ही व्हायला पाहिजे आणि समाजीकीकरण सारखा योजनाची भराभराट व्हायला पाहिजे. या सर्वासोबतच अत्यंत महत्वाची बाब म्हणजे पर्यावरण संरक्षणासाठी मानवी भावना जागृत करणे आवश्कय आहे. ही भावना जर प्रत्येक क्षेत्रात जागृत झाली तर अनेक स्तरावरून संरक्षणाचे प्रयत्न होऊ शकतात.

पर्यावरण जनजागृती होण्यासाठी काही प्रसार माध्यमांचा उपयोग होतो. ते खालीलप्रमाणे.

१) आकाशवाणी

२) टी.व्ही.

Scanned with CamScanner

३) मासिके

४) वृत्तपत्र

५) इंटरनेट

वरील सर्व माध्यमे पर्यावरण जनजागृती मध्ये अत्यंत महत्वाची भुमिका पार पाडत आहेत. अशा भुमिकामधून जनजागृती मोठ्या प्रमाणात होते. आकाशवाणी हे माध्यम भारतातील खेड्यापाड्यामध्ये शेती, सेंद्रीय खते पर्यावरण यावर सतत माहितीवर कार्यक्रम

Scanned with CamScanner

चर्चासत्रे व विविध प्रोग्रॅम सादर करून जनजागृती करत आहे. आजच्या या आधुनिक स्पर्धात्मक युगात मानव आपल्या स्वत:साठी निसर्गाचा कलह करण्यावर येऊन टपला आहे.

Scanned with CamScanner

## २. अभ्यास पध्दती

सकाळ य वृत्तपत्रातून पर्यावरणविषयी होणारी जनजागृती या विषयासंबंधी संशोधन करण्यासाठी खालील अभ्यास पध्दतीचा उपयोग केला जातो.

१) समस्या सूत्रण ( विषय निवड)

आम्ही पर्यावरण विषयाच्या अहवाल संदर्भात खालील विषयाची निवड केली जाते. सकाळ वृत्तपत्रातून पर्यावरण विषयी होणारी जनजागृती एक अभ्यास

२) विषय निवडीचे उद्दिष्ट्ये

१) पर्यावरणातील संतूलन ढासळत आहे. त्या संदर्भात प्रसार माध्यमांची भुमिका काय आहे हे जाणून घेणे.

२) सकाळ वृत्तपत्रातून पर्यावरण विषयी होणारी जनजागृतीला महत्व दिले जात आहे.

२) अभ्यास पध्दती

सकाळ वृत्तपत्रातून पर्यावरण विषय होणारी जनजागृती एक अभ्यास या अहवालासाठी खालील अभ्यास पध्दतीचा उपयोग केला जातो.

अ) संशोधन आराखडा :

वरील विषयासंदर्भात आम्ही वर्णनात्मक संशोधन आराखड्यात उपयोग केला जातो.

ब) नमुना निवड :

वरील विषयां संदर्भात सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा उपयोग जुलै व सप्टेंबर महिन्यातील सकाळ वृत्तपत्राची निवड केली आहे.

क) तथ्य संकलन :

वरील विषय संदर्भात दुयम्म तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. त्यामध्ये मासिक पुस्तके संदभ ग्रंथ अहवाल जुलै व सप्टेंबर सकाळ वृत्तपत्र याचा उपयोग केला आहे.

ड) तथ्य विश्लेषण :

वरील विषयाच्या तथ्य विश्लेषणासाठी वर्गीकरण  सारणी करा. अनुमान इ.

Scanned with CamScanner

विश्लेषण पध्दतीचा उपयोग केला आहे.

ई) प्रकरणे :

१) अभ्यास पध्दती

२) सकाळ वृत्तपत्रातून पर्यावरण जनजागृती

३) निष्कर्ष व सुचना

सकाळ या वृत्तपत्रातून पर्यावरण विषयी होणारी जनजागृती एक अभ्यास या विषयासाठी वरील अभ्यास पध्दतीचा उपयोग केला आहे.

## पर्यावरण व्यवस्थापनाचे शिक्षण

मानवी विकास सर्वस्वी पर्यावरण म्हणजे निसर्गावर अवलंबून असल्याने मानवाच्या पर्यावरणात हस्तक्षेप होणे साहजिकच आहे. विकासाच्या हव्यासापायी मानवाने नैसर्गिक तत्वे, परिस्थितीक तत्वे यांनाच शह दिला आहे. याचे दृश्य व अदृश्य परिणाम आपल्याला जाणवू लागले आहेत. उपभोगी वृत्तीच्या वाढला मात्र मानवाने मृदा, पाणी, वनस्पती, खनिजे, शक्तीसाधने यांचा नाश केला. त्याजागी मानवनिर्मित पर्यावरणाचा विकास आपल्या गरजा पुरविण्यासाठी केला. प्रचंड शहरे, कृत्रिम व कालवे यांचा वापर बेसुमार पणष केला यामुळे मृदा, खनिजे, प्राणी व वनस्पतीचे प्रचंड नुकसान झाले.

मानव व पर्यावरण याचा संबंध मानवाच्या पृथ्वीवरील अस्तित्वापासून आहे. पर्यावरणाचा मानवावर परिणाम होतो. पर्यावरण रक्षणाची व संवर्धनाची ही जबाबदारी घेतली पाहिजे.

पर्यावरण संकल्पना :

ही संकल्पना बहुव्यापक सर्व समावेश आहे. पर्यावरण हे स्थळ व काळाप्रमाणे बदलत आहे. पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन आणि मानवी जीवनाचा मानवी जीवनावर पडणारा प्रभाव म्हणजे पर्यावरण शास्त्र होय.

## सकाळ वृत्तपत्र आणि पर्यावरण

पर्यावरण संरक्षणाची गरज भासत आहे. यासाठी आम्ही एक अहवाल तयार करीत

Scanned with CamScanner

आहोत. यासाठी पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे.

यासाठी सकाळ या वृत्तपत्रातून जनजागृती हा एक अभ्यास हा विषय घेतला आहे. सकाळ वृत्तपत्रातून मोठ्या प्रमाणात पर्यावरणविषयी बातम्याद्वारे जनजागृती होत आहे.

सकाळ या वृत्तपत्रातून होणारी जनजागृती आणि पर्यावरण

सकाळ या वृत्तपत्रातून विविध पर्यावरणविषयी माहिती दिली जाते. वृत्तपत्र वाचत असताना त्या पेपरमध्ये पर्यावरणाविषयी असलेले राबवलेले विविध बातम्या येतात व समाजामध्ये पर्यावरणाविषयी चांगली–वाईट बातम्या व माहिती छापून येतात व त्यामुळे पर्यावरण मानव यांचा संबंध कसा आहे. अशा बातम्यातून मानवाच्या मनात जागृती भावना निर्माण होतात. पर्यावणातील प्रदूषणाच्या समस्या व त्यामुळे मानवी जीवनावर होणारा परीणाम याची माहिती आपणाला वृत्तपत्रातून मिळते. त्यासाठी शासन विविध कार्यक्रम, उपक्रम राबवत आहे. त्यामुळे सकाळ या वृत्तपत्रातून बरीच माहिती गोळा होते.

या वृत्तपत्रातून येणाऱ्या मासिके, मधून पर्यावरण याबाबत ही जनजागृती होत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रासारख्या जैवविविधता व निसर्ग सौंदर्याने नटलेल्या पर्यावरणाबद्दल माहिती देण्यात येते. सह्याद्री सारखा पर्वतरांगावर येणाऱ्या फुलांची विविध जाती प्रजाती याबद्दल विविध माहिती देवून पर्याटनास वाव देत आहे. चांदोली सारख्या अभयारण्यामध्ये आढळणाऱ्या विविध वनौषधी वनस्पती, प्राणी, याबद्दल माहिती देवून सामाजीक जबाबदारी पूर्ण करणाऱ्या प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांना असेच प्रयत्न इतर व्यक्तीकडून होत बसलेल्या पाठपुराव्यामुळे बल मिळत आहे.

## सकाळ वृत्तपत्रातून वृत्तांचे विश्लेषण

वृक्षाच्या संदर्भातील ११ बातम्या पाणी व घटकासंदर्भात २० बातम्या जनावरे या वृक्षाच्या संदर्भातील १ बातमी जमिनी संदर्भातील ४ बातम्या, नैसर्गिक वायू या संदर्भातील २ बातम्या दुष्काळ या संदर्भातील १ बातमी, आरोग्य या संदर्भातील १ बातमी, पक्षी संवर्धन या संदर्भातील १ बातमी,निसर्ग या संदर्भातील १ बातमी पर्यावरण संवर्धन संदर्भातील २ बातम्या, महापूर या संदर्भातील १ बातमी, शिबीर या संदर्भातील १ बातमी, प्रदूषण पर्यावरण या संदर्भातील २ बातम्या वनश्री पुरस्कार व पर्यावरण अभ्यास १

Scanned with CamScanner

बातमी.

**पर्यावरण व्यवस्थापन :**

कोल्हापूर येथील शाहू सेंट्रल इन्स्टिटयूल ऑफ बिझनेस एज्युकेशन ॲड रिसर्चच्या (सायबर) पर्यावरण व्यवस्थापन विभागाला संस्थेचे संस्थापक संचालक डॉ. [redacted]डी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण व्यवस्थापनाच्या एक वर्षाच्या पदव्युत्तर डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी(पी.जी.डी. इ. एम) यू इंटर डिसीप्लिनरी आणि इमर्जिंग एरियानसाठी मान्यता दिली.

**पर्यावरण व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे उद्देश:**

पर्यावरण हा विषय शालेय स्तरापासून व्यक्तीचा केला असल्याने हा विषय शिकवताना अनेक अडचणी निर्माण होतात. या अभ्यासक्रमाद्वारे शिक्षकांच्या पर्यावरण विषयक ज्ञानाच्या कक्षा विस्तृत व विशाल बनवून त्याचा फायदा भावी पिढीस मिळू शकेल. पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना पर्यावरण संरक्षण व व्यवस्थापन करण्यासाठी जनतेमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे. या अभ्यासक्रमाद्वारे व्यवस्थापनाचा शास्त्रशुध्द माहितीसाठी संशोधनात अध्यापक औद्योगिक क्षेत्रासारख्या विविध क्षेत्रामध्ये एक नवीन दृष्टी निर्माण होण्यास मदत होणार होय.

**पर्यावरण संवर्धन केल्याबद्दल मिळालेला पुरस्कार**

पर्यावरणाची शिक्षणात गरज प्राथमिक स्तरावर पर्यावरणविषयी जागृती निर्माण झाली आहे. यामुळे पर्यावरण संवर्धन महत्वाचा विषय ठरला आहे. पर्यावरणाचे महत्व प्रत्येक नागरीकापर्यंत पोहचणे ही काळाची गरज आहे.

पर्यावरण अभ्यास शालेय स्तरांवर सक्तीचा विषय झाला आहे.

कडेगाव भारती विद्यापीठाच्या पाचगणी येथील भारती विद्यापीठ हायस्कूलला राज्यशासनाचा २००४ मधील प्रथम क्रमांक (वनश्री पुरस्कार ) मिळाला. जून १६८८ पासून हायस्कूलला २१००,७५० विविध वृक्षांची लागवड केली व त्याची जोपासनाही केली त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

कारणे :

१) पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनलेली आहे

Scanned with CamScanner

२) पर्यावरण संवर्धनामुळे मानवी जीवन सफल व समृध्द झाले आहे.

१) जमीन

पर्यावरणात जमीन ही अत्यंत महत्वाचा घटक आहे. जमिनीवर अतिपाण्याचा व रासायनिक खतांचा वापर केल्यामुळे जमीन क्षारपड बनते. क्षारपड बनलेल्या जमिनीवरील काही उपाय खालीलप्रमाणे येथे सांगता येतील.

१) उदाहरण दयावयाचे झाले तर पलूस तालुक्यातील नागराळे येथील सुमारे १००० एकर जमीन क्षारपड बनली आहे.

२) क्षारपड जमीन सुधारावी व जमिनीचा पोत सुधारावा यासाठी चर खुदाई उपयोगी पडते.

३) चर खुदाई केल्यानंतर शासनामार्फत त्या ठिकाणी विविध प्रकारची झाडे लावली जातात.

शेती विषयक

कृषी क्रांती हवी

भारतामध्ये ६९% रोजगार आज कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. अन्न-धान्य उत्पादनात आपण केवळ स्वयंपूर्ण आहोत. यावर समाधान मानून चालण्यासारखे नाही. कृषी क्षेत्रात मोठी क्रांती होण्याची गरज आहे. त्यासाठी कृषी नियोजनात मोठे फेरबदल घडवून आणावे लागतील. तसेच देश २१ व्या शतकातील विविध आव्हानांना समृध्दपणे तोंड देवू शकेल. कृषी क्षेत्रातील सद्य स्थिती आगामी उद्दिष्ट्ये नियोजन आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांना सविस्तर उहापोह या भारत २०२५ या विशेषाकांत.

**पीक संरक्षणासाठी किटकनाशके वापरा :**

खरीप हंगामात पिकांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी किटकनाशकाची फवारणी करावी. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी नंदकुमार कदम यांनी केले आहे.

**गांडूळ खत प्रकल्प:**

महाराष्ट्रातील पहिल्या गांडूळ खत प्रकल्प सहकारातून शेती समृध्दीकडे असे ध्येय

Scanned with CamScanner

ठेवून, सेंद्रीय शेती बरोबरच गांडूळ खताचा वापर करून शेती करण्याकडे शेतकरी आकर्षिला जातो. शासनाकडे सेंद्रीय शेतीला आणि त्याचा एक भाग म्हणून गांडूळ खत प्रकल्पानां प्राधान्य दिलेले आहे.

## २. वृक्षसंवर्धनाकरता

वृक्षारोपन वृक्षसंवर्धन ही जीवनाशी मानवी संस्कृतीशी निगडीत गोष्ट आहे.. मनोभावना बाजूला ठेवली तरच ही वसुंधरा सुंदर राहील. अन्यथा जंगल संस्कृतीचा विद्वंस तुम्हा-आम्हास एक दिवस मानव संस्कृतीचा ऱ्हासापर्यंत घेऊन गेल्या शिवाय राहणार नाही.

जंगलांना भाग लावण्याचे लागण्याचे प्रकार सर्व घटकांना हानीकारक आहेत. घाटमाथ्यावरच्या गगन बावड्यापासून रामलिंग पर्यंतच्या बाबतीत आपण सर्व जन परिचीत आहेत. ही माणसे झाडे लावीत नाहीत. झाडे लावण्यापेक्षा ती वाढविणे फार जिकीरीचे आहे. अमृता नरकथा नावाच्या अतिशय गुणकारी आणि उपयुक्त अशा वनस्पतीची तस्करी कशी रोजरोसपणे सुरू आहे. राधानगरी, कोयना आणि चांदोली अभयारण्यामध्ये सापडणारी ही वनस्पती कर्क रोगावर गुणकारी असून तीन हजार वर्षांपूर्वीपासून आयुर्वेदात आपल्या अश्वगंधा, निलगिरी, कडूनिंब, यासारख्या शेकडो औषधी वनस्पती हळूहळू आपण संपवतो आहोत.

### वृक्षारोपण संवर्धनाची गरज

औद्योगिकीकरण, बेमुसार लोकसंख्या वाढ अवैद्य वृक्षतोड यामुळे जंगलाचा ऱ्हास होत आहे. पाणी टंचाई ही महाराष्ट्राला भेडसवणारी एक प्रमुख बाब बनली आहे. जंगल हेच पाण्याचा महत्वाचा स्तोत्र आहे. कारण बहुतेक सर्वच नद्यांची उगमस्थाने जंगलात आहेत. म्हणून वृक्षसंवर्धन महत्वाचे आहे.

**वृक्षलागवडीची गरज:**

पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस ढासळत आहे. झाडेतोड, वने संपवा अशीच कृती झाल्याचे पहावयास मिळते. केंद्र सरकात व राज्य सरकार यांच्या वनीकरणाच्या अनेक उपयुक्त योजना आहेत. पण तरीही वृक्ष लागवड व संवर्धन याकडे दुर्लक्ष होते.

Scanned with CamScanner

**वृक्षतोड :**

जत तालुकयातील पूर्व भागात वृक्षतोड सुरू आहे. झाडे लावा झाडे जगवा ही घोषणा हवेत विरली आहे. वनराई विरळ होत आहे. सतत ४ वर्षे अत्यल्प पाऊस पडला. शेतात पुरेसे धान्य येत नाही. शेतकऱ्यांना दुष्काळाचा तडखा व कर्जबाजारपणी यामुळे शेताच्या बांधाची झाडे तोडून ती विकण्याची मोहिमच सुरू आहे. रस्त्याच्या कडेला असणारी झाडे देखील राजरोसपणे तोडून ती विक्रीसाठी सॉमिलमध्ये पाठविली जात आहे. रात्री व पहाटेच्या वेळी ट्रक, ट्रॅक्टर मधून आंबा, लिंब, वड, पिंपळ चिंच, बाभूळ अशी झाडे जातात.

**वृक्षारोपन संवर्धन काळाची गरज:**

महाराष्ट्रात रस्ते दुरूस्तीसाठी रूंदीकरण, नवीन रस्त्यांची निर्मिती, चौपदरी करण्याचे काम वेगाने चालू आहे. पण रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या जुनाट मोठमोठ्या वृक्षांची तोड मात्र जोराने चाललीय. त्यामध्ये वड, पिंपळ, जांभूळ, बाभूळ, लिंब, निलगिरी, आंबा हे वृक्ष वनऔषधी आहेत. मानव वनस्पतींची मुलाप्रमाणे काळजी घेत. वनामध्ये गुरूच्या आज्रमात शिक्षण व्हायचे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी, या उतीप्रमाणे या सोयऱ्यांची देखभाल जतन म्हणजे करणे गरजेचे आहे. झाडे लावा झाडे जगवा हा संदेश सर्वांनी आचरनात आणावा. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वनविभाग महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग वेळीच वृक्षसंवर्धनासाठी प्रयत्न करावेत.

**वनमहोत्सव दिनानिमित्त वृक्षांची लागवड:**

सांगली वन महोत्सव दिनानिमित्त ओम आदिनाथ सेवाभावी संस्थेतर्फे दंडोबा डोंगरावर ता. तासगाव येथे पाच हजार रोपांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

पाणी

## दुष्काळामध्ये होणारे परिणाम

मान्सून लांबल्याने जिल्ह्यातील दहापैकी सहा तालुक्यात आतापर्यंत अत्यल्प म्हणजे सात टक्यापेक्षा कमी पाऊस कमी क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. सरासरी पाच तालुक्यातही जूनच्या सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. आटपाडीत सरासरीच्या पंचवीस टक्के तर तासगावांत पन्नास टक्के पाऊस झाला आहे. खरीपांच्या पेरण्या पावसाच्या उघडीपी नंतर गती येईल.

## पाणी नैसर्गिक तळी आणि पूर

नैसर्गिक बांधावर पाण्याचा दाब वाढत जातो. व यामुळे बांध फुटून प्रचंड प्रमाणात पूर येतो. नैसर्गिक बांधावर पाण्याचा दाब वाढत जातो. व यामुळे बांध फुटून प्रचंड पूर येतो. सतजल नदीची पारांचू नावाची एक उपनदी आहे. तिचा उगम तिबेट मध्ये होतो. २००३ परांचू वर भूस्खलनामुळे एक तळे निर्माण झाले आहे. अधिक पाणी साचल्याने नैसर्गिक धरण फुटण्याचा व त्यामुळे पूर येण्याचा धोका निर्माण होतो. पारांचू या नदीवर अंदाजे ४० मीटर उंचीच्य नैसर्गिक बांध तयार झाला आहे. व एक मोठे तयार झाले.अथवा तळ्यामधील पाण्याचा मोठा साठा नदीच्या वाहत्या पाण्यामुळे सतत वाढत जातो. व याच कारणामुळे हे धरण फुटण्याचा धोका वाढत जातो. योग्य प्रमाणात वा योग्य वेगाने पाण्याचा निचरा होत राहिला तर हे तळे स्थिर होते. बडापाणी नावाचे तळे निर्माण झाले आहे ते अजूनही स्थिर स्वरूपात अस्तित्वात आले.

## पाणी प्रश्न गांभीर्याने सोडवा.

पाणी पेरा पाणी जिरवा अग्रलेख वाचला पाणी केवळ धरणाच्या माध्यमातून न अडविता जागोजागी छोट्या छोट्या माध्यमातून अडवले जाऊ शकते. त्यामुळे जमिनीतही पाणी जिरण्याचही प्रक्रिया होते. पाणी हे म्हणजे जीवन हे शासनाचे घोषवाक्य आहे. शासनाने पाण्याचा प्रश्न हा गांभीर्याने सोडवला आहे. अशी प्रतिक्रिया विठ्ठल शिरगाव (देवगड) यांनी व्यक्त केली.

Scanned with CamScanner

## राज्यातील सर्वच नद्या प्रदुषित:

पिण्यासाठी शुध्द पाणी उपलब्ध असणे हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. आणि शुध्द पाणी पुरवठा करणे हे प्रत्येक पालिकेचे मुलभूत कर्तव्य आहे असे झाले तरी महाराष्ट्रातील पाण्याचे सर्वच नैसर्गिक स्त्रोत प्रदुषित असल्याचे आढळून आले आहे. या बाबतच्या अहवालानुसार कृष्णा नदी ही राज्यातील सर्वाधिक प्रदूषित नदी आहे. तर पंचगंगा तिसरा क्रमांक लागतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जलप्रदूषणाचा आढावा घेण्यासाठी दरवर्षी महाराष्ट्रातील नद्यांचे पाण्याची गुणवत्ता तपासतात. यावर्षी करण्यात आलेल्या भौतिक रासायनिक आणि जैविक चाचण्या निष्कर्ष पाहता राज्यातील सर्वच नद्या प्रदुषित असल्याचे आढळून आले.

पुणे विद्यापिठाच्या वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख आणि सर्वेक्षणाचा अहवालात तयार करण्यात येणार आहे. राष्ट्रीय नदी कृत योजने सारख्या प्रकल्पावरही काम चालू आहे. नदीकाठर्चीया परिसरातील मानवी हस्तक्षेप टाकण्यासाठी फायद्याचे काटेकोर पालन केले पाहिजे.पुढील काही क्षेत्रातही औद्योगिकरण व शहरीकरण नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्याशिवाय पर्यावरणातही हा ऱ्हास थांबणे शक्य आहे. जे विविधतापूर्ण परिसंस्थेचे पुर्नजीवन आणि संवर्धन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती आणि पर्यावरण शिक्षणाची गरज आहे.

Scanned with CamScanner

| नदीचे नाव | कोलाय गटातील जंतूची संख्या | प्रदूषणाचे कारण |
|---|---|---|
| कृष्णा | १८०० | साखर कारखाने शेती |
| पंचगंगा | ५५० | शिरोली औद्योगिक क्षेत्र |
| काळू नदी | २०० | आंबविली औद्यागिक क्षेत्र |
| पाताळ गंगा | ३५० | खोपोली तारूड, औद्योगिक क्षेत्र |
| उल्हास | ३५० | सांडपाणी |
| भीमा | ९०० | लोकवस्ती मैल |
| नीरा | १८०० | लोकवस्ती |
| गोदावरी | उपलब्ध नाही | औद्योगिक क्षेत्र |
| तापी | उपलब्ध नाही | औद्योगिक क्षेत्र |

निसर्गाचा समतोल राखू या :

निसर्गाचा समतोल राखण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा यासाठी झाडे लावावीत, जगवावीत, जंगले राखावीत. तरच जीवन आहे. ऑक्सिजनच्या प्रमाणाचा असमतोल झाडामुळेच राहतो. झाडे मातीचा निचरा होऊ देत नाहीत. मोठमोठ्या पुरांत पाणी वाहताना मातीही वाहते. माती भिजल्याने फुगते.

आपल्या देशातील नदया ही आपली मोठी संपत्ती आहे. पाणी पूर्णपणे न थांबता त्यांना समुहाकडे जाचास मोकळीक द्यावी. पुरस्थिती निर्माण होणार नाही. पावसाळ्याचे पाणी साठविण्यासाठी कृत्रिम साठे करावेत.

पूर नियोजनाची संकल्पना रूजायला हवी.

मानवाने त्यावेळी शेती करण्यासाठी नदीच्या काठी जमीन सपाट करण्यास सुरूवात केली. तेव्हापासून पूर येऊ लागल्याच्या नोंदी आहेत. पूर येणारच हे गृहीत धरून दृष्टीने ही संकल्पना रूजायला हवी.

## ४ प्राणी, पक्षी

पक्षांचे संवर्धन आवश्यक :

त्यामुळे दिवसेंदिवस जंगलतोडे मोठ्या प्रमाणात होत असेल पक्षांची निवास, स्थाने नष्ट होत आहेत. पक्षांची निवास स्थाने नष्ट होत आहेत. त्यामुळे तीव्र पाणी टंचाईमुळष जलाशये कोरडी पडली आहेत. याचा परीणाम पक्षांची संख्या घटली आहे. निसर्गाचा हा अनमोल ठेवा जतन होण्यासाठी काही व्यापक उपाय योजना केल्या पाहिजेत. यामध्ये पक्षी अभयारण्यांची निर्मिती करणे, जलाशये,कोरडी पडणार नाहीत. याची दक्षात घेतली पाहिजे. अशी प्रतिक्रिया डी.जी. पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## ५. नैसर्गिक वायू

भारतात नै. वायूची मागणी सतत वाढत आहे.पण त्याबाबत पुरवठा हा कमी पडत आहे. या नै. वायूचा उपयोग हा इंधन घरगुती वापर यासाठी मोठ्या प्रमाणात होता. इंधन म्हरून सी.एन. जी. वापर भारतात सुरू झाला. त्याचा देखभालीचा वेग खर्च कमी असतो. वायू वापरला तर खनिज तेलाचा आयातीचा खर्च सी.एन. जी. इंजिने व गणावरील खर्चात लक्षणीय बचत करतात. इटलीमध्ये २५ लाख गाड्या सी.एन.जी. वर पळत आहेत. १९३९ मध्ये जपानने पण विद्युत निर्मितीसाठी सी.एन.जी. वापर सुरू केला. यामधील तंत्रज्ञान सुधारत गेले. वायूची मागणी वाढली व उत्पादन कमी पडू लागले. भारतात बऱ्याच ठिकाणी नैसर्गिक वायूचे साठे सापडत आहेत.

**ध्वनी प्रदुषणविरहीत कारवाईचे आदेश**

जिल्ह्यातील वाढत्या ध्वनीप्रदुषणा विरोधात कडक कारवाई आदेश पोलीस प्रमुखांनी दिले आहेत. ही माहिती राष्ट्रीय ग्राहक संघटनेचे अध्यक्ष यांनी दिली आहे.

ते म्हणाले संघटनेचे ध्वनिप्रदुषण बाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली

Scanned with CamScanner

होती.. न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्हयाला ध्वनीमापक यंत्रे पुरवठयाचे आदेश दिले आहेत. निकालाच्या पार्श्वभूमीवर बैठक झाली. बैठकीला परिपटल अधिकारी अभय देशपांडे पोलिस निरीक्षक प्रकाश पाटील, उस्मान सय्यद, मदन शहा उपस्थित होते.

भारत आणि ब्रिटन यांनी संयुक्तपणे केलेला निष्कर्ष व पुण्यातील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मिटारिऑलॉजी या संस्थेसह देशभरातील सात संस्थेतील शास्त्रज्ञांनी एकत्रित येऊन अभ्यास केला व पुढील निष्कर्ष लावला.

१) देशाच्या तापमानात व पाऊसमानात लक्षणीय वाढ होईल.

२) पावसावर अवलंबून असलेल्या पिकांवर म्हणजेच देशातील ६०% पिकांवर मोठा परिणाम होईल.

३) वनक्षेत्रातही बदल होईल, जैविक विविधतेचे मोठे नुकसान होईल.

४) टिंबर व इंधनसाठीच्या लाकडाचे प्रमाण कमी होईल पर्यायाने ऊर्जा उत्पादनासाठी घट होऊ शकेल.

Scanned with CamScanner

६. आरोग्य

आरोग्य केंद्राच्या आवारात वृक्षारोपन :

प्रत्येक विभागात वृक्षारोपण करून तो जोपासने ही काळाची गरज आहे.असे मत सांगली जिल्हा परिषदेतील समाजात कल्याण सभापती यांनी व्यक्त केली. या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आयोजीत वृक्षारोपन समारंभात बोलत होत्या.

७. प्रदुषण

**जैविक इंधनाचा वाढता वापर**

युरोपियन समुदायातील राष्ट्राकडून जैविक इंधनाचा वापर वाढला असून इंधन तेलाच्या वाढत्या किंमती व वातावरणातील बदल बघता या वापरात वाढ होत चालली आहे. युरोपियन समुदयाच्या कृषि आयुक्तांनी याबाबत सांगितले की, २००७ च्या अखेरीस बायोभास कृतीयोजना आखण्यात आली. याद्वारे पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढण्याच्या प्रयत्न आहे.

**महाप्रदुषण रोखा**

मानवाकडून पर्यावरणाच्या होत चाललेल्या हानीमुळे मान्सुनमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होण्याची शक्यता असून वृक्षात तसे बदल होऊ लागल्याने भारत कोलमडण्याची भिती जागतीक पातळीवरच्या पर्यावरण शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे.

जगभरात कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण झपाट्याने वाढत चालल्याने हवामानातील प्रदुषण भयानतेच्या टप्प्यावर येऊन बसले आहे. भारतात प्रदुषण वाढत चालल्यामुळे जमिनीपर्यंत सुर्याची किरणे पोचण्यास विलंब होऊन जमीन तापू लागली आहे.

निष्कर्ष

सकाळ वृत्तपत्रातून होणारी पर्यावरणविषयी जनजागृती, यामधील आलेले विविध लेख व बातम्या यांचा चिकित्सक अभ्यास करून गटाने पुढील निष्कर्ष काढला.

Scanned with CamScanner

१) जलप्रदुषण ;

दि. ११ जुलै २००८ या दिवशी आलेल्या बातमीतून जलप्रदुषण बाबत मिळालेल्या बातमीतून लोकांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. तसेच पाण्याचे इतर स्त्रोत नैसर्गिक अवस्थेत शुध्द व स्वच्छ कसे राहते. याबाबत केलेले निष्कर्ष प्रशंसनीय आहेत.

२) जमिनीचे प्रदुषण :

बागायीत शेतीत शेतकऱ्यांनी केलेल्या पाण्याचा सनवार तसेच रासायनिक खतांचा अतिरीक्त यामुळे जमिनीची प्रत निवडलेली दिसते. हजारो एकर जमीन क्षारपड झालेली दिसते. याबाबत ही सकाळ वर्तमान पत्राने दि. २ जुलै २००८ या दिवशीच्या लेखातून या प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.त्या लेखकाने सुचवलेल्या बातमीन ठिबक, तुषार, सिंचन खरोखर बनवता येईल.

३) ध्वनि प्रदुषण :

सकाळ वृत्तपत्राने दि. २३जुलै २००८या दिवसी बातमी देवून याबाबत समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. परंतु या लोकांचे अजूनही प्रबोधन घेण्याची गरज आहे. खेड्यापर्यंत हा विषय अजून पोहोचलेला नाही. तरीही सकाळचे याबाबत अजून प्रयत्न करावेत व हा विषय गांभीर्याने लोकांच्या लक्षात आणून द्यावा.

४) पर्यावरणबाबत :

पर्यावरणाच्या या ऱ्हासाने उग्रस्वरूप धारण करण्याच्या अगोदर समाजाचे प्रबोधन होण्याची गरज आहे. परंतू दुर्देवाने आम्ही निवडलेल्या कालखंडातील एकही अंकात या विषयाबाबत एक ही बातमी किंवा लेख दिसत नाही. त्यामुळे महिन्यातून एकदातरी याबाबत लेख देवून समाजाचे प्रबोधन करणे गरजेचे आहे.

५) वृक्षसंवर्धन :

या विषयात सकाळ वृत्तपत्राने अनेक बातम्या व लेख लिहून लोकांचे चांगलेच प्रबोधन केल्याचे दिसते. अनेक संस्था, शाळा, महाविद्यालय दरवर्षी वृक्षारोपन करून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवण्याचा प्रयत्न करत असतात.

Scanned with CamScanner

वृक्षारोपन जुलै- ऑगस्ट सप्टेंबर पावसाळी कालावधी अत्यंत अनुकुल असता सकाळचे याबाबतचे प्रयत्न स्तुत्य आहेतच. तरीही या कालावधीत दर आठवड्याला विशेष लेख लिहून समाजास वृक्ष लागवडीस प्रवृत्त करावे. सकाळ वृत्तपत्र केस समाजाभिमुख आहे हेच या लेखावरून लक्षात येते या वृत्तपत्राचे संस्थापक के. ना. भी. परूळकर यांनी घालून दिलेल्या उद्दिष्टापासून अजून ते बाजूला गेलेले नाहीत हे लक्षात येते.

Scanned with CamScanner

# चर्चा

पर्यावरण आणि मानव यांचा जवळचा संबंध आहे. पर्यावरणाचा संरक्षणासाठी मानवाने समाजात जनजागृती करणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने यात भाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आज शाळा व कॉलेज यातून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपन जागृती होते. हे उपक्रम राबविल्यामुळे पर्यावरण जन जागृती होते. म्हणूनच आज संपूर्ण जगात ५ जून हा दिवस विश्व पर्यावरण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

मानवी विकास सर्वस्वी पर्यावरण म्हणजे निसर्गावर अवलंबून असल्याने मानवाच्या पर्यावरणात हस्तक्षेप होणे साहजिकच आहे. विकासाच्या हव्यासापायी मानवाने नैसर्गिक तत्वे, परिस्थितीक तत्वे यांनाच शह दिला आहे. याचे दृश्य व अदृश्य परिणाम आपल्याला जाणवू लागले आहेत. उपभोगी वृत्तीच्या वाढला मात्र मानवाने मृदा, पाणी, वनस्पती, खनिजे, शक्तीसाधने यांचा नाश केला. त्याजागी मानवनिर्मित पर्यावरणाचा विकास आपल्या गरजा पुरविण्यासाठी केला. प्रचंड शहरे, कृत्रिम व कालवे यांचा वापर बेसुमार पणष केला यामुळे मृदा, खनिजे, प्राणी व वनस्पतीचे प्रचंड नुकसान झाले.

मानव व पर्यावरण याचा संबंध मानवाच्या पृथ्वीवरील अस्तित्वापासून आहे. पर्यावरणाचा मानवावर परिणाम होतो. पर्यावरण रक्षणाची व संवर्धनाची ही जबाबदारी घेतली पाहिजे.

Scanned with CamScanner